मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» शनिवार, दि. 6 जुलै 2024 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# पहिल्या तिमाहीमध्ये तब्बल 432 कोटींचा कर जमा

## 54 टक्के मालमत्ताधारकांनी घेतला सवलतींचा लाभ : आयुक्तांकडून जागरूक करदात्यांचे आभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागाच्या तिजोरीमध्ये आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये ४३२ कोटी रुपयांचा मालमत्ताकर संकलित करण्यात आला. शहरामध्ये निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमिनी आदी अशा एकूण ६ लाख ३० हजारांहून अधिक नोंदणीकृत मालमत्ता असून, यावर्षी त्यापैकी ५४ टक्के करदात्यांनी पहिल्या तिमाहीमध्येच मालमत्ताकर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. करदात्यांनी जागरूकपणे कर भरून सवलतींचा लाभ घेतल्याने महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी जागरूक करदात्यांचे आभार मानले आहेत.

नागरिकांनी मालमत्ताकर भरण्यासाठी करसंकलन विभागाने विविध उपाययोजना राबवल्या. त्याच्या माध्यमातून करदात्यांपर्यंत मालमत्ताकरावरील सवलतीबाबत विविध प्रकारे जनजागृती करण्यात आली. यामुळे नागरिकांना सवलतीबाबत माहिती होऊन नागरिकांनी पहिल्या तिमाहीमध्येच आपला मालमत्ताकर भरण्यासाठी प्राधान्य दिले आहे. सवलतीबाबत जनजागृती झाल्याने परिणामी, सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये एकूण मालमत्ताधारकांपैकी ५४ टक्के मालमत्ताधारकांनी मालमत्ताकर भरला.



### ७३ टक्के करदात्यांनी भरला ऑनलाइन स्वरूपात कर

शहरातील एकूण मालमत्ताधारकांपैकी ३ लाख ५७ हजार ११ इतक्या मालमत्ताधारकांनी ४३२ कोटींचा कर जमा केला असून त्यापैकी २ लाख ६२ हजार ५२२ इतक्या म्हणजेच ७३ टक्के मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात कर भरून सवलतींचा लाभ घेतला आहे.

> शहरातील सर्व जबाबदार, प्रामाणिक आणि जागरूक करदात्यांनी यावर्षीही पहिल्या तिमाहीमध्ये कर भरून सवलतींचा लाभ घेतला आहे. त्याबद्दल सर्व जागरूक करदात्यांचे मनापासून आभार मानतो. शहरातील करदात्यांसाठी विभागाने जाहीर केलेल्या विविध योजनांचा लाभ घेत कराचा भरणा केल्याने शहराच्या प्रगतीमध्ये करदात्यांचा मोलाचा वाटा आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

### निवासी मालमत्ताधारकांकडून मालमत्ताकराचा भरणा

**» गतवर्षीप्रमाणे यावर्षीही पालिकेने राबविलेल्या 'सिद्धी' प्रकल्पातून सुमारे ४०० महिलांनी मालमत्ताधारकांना बिलाचे वाटप केले, त्यामुळे नागरिकांनी ३० जूनपर्यंत सवलतींचा लाभ घेत कराचा भरणा केलेला आहे, तसेच विभागातील सर्व कर्मचाऱ्यांची सांघिक कामगिरी केली असून त्यामुळे करवसुलीमध्ये सातत्य ठेवण्यात विभागाला यश आले आहे. कर संकलनाच्या १७ झोनपैकी वाकडमध्ये सर्वाधिक ४९ हजार ३६ नागरिकांनी ६८ कोटी, तर पिंपरीनगर झोनमध्ये सर्वात कमी ३ हजार ९८२ मालमत्ताधारकांनी फक्त 3 कोटींचा कर भरला आहे, तसेच सर्वाधिक ३ लाख ११ हजार ६७ निवासी मालमत्ताधारकांनी तब्बल २६० कोटींच्या कराचा भरणा केला आहे, असे करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.**

> करसंकलन विभागाद्वारे नागरिकांना मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घेण्यासाठी जनजागृतीद्वारे, एसएमएसद्वारे आवाहन करण्यात आले. करसंकलन विभागाने प्रकल्प 'सिद्धी' उपक्रमांतर्गत बिलांच्या केलेल्या वाटपाचा यामध्ये मोलाचा वाटा असून, विभागाने प्रत्येक आघाडीवर घेतलेल्या पुढाकारामुळे यावर्षी ४३२ कोटींचा कर जमा झाला आहे. नागरिकांनी वेळेवर कर भरून सवलतींचा लाभ घेतला, यामुळे त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.
>
> **- नीलेश देशमुख, सहाय्यक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

---

# इंद्रायणी नदी वाचवण्यासाठी महाविकास आघाडीच एल्गार आंदोलन

## काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना उबाठा गट यांच्यासह विविध पर्यावरण प्रेमी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदी प्रदूषणाच्या विरोधात पिंपरी- चिंचवड शहर महाविकास आघाडीच्या वतीने आज इंद्रायणी नदीकाठी इंद्रायणी बचाव एल्गार आंदोलन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रीय काँग्रेस यांच्यासह विविध पर्यावरण प्रेमी संघटनांचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने भाजप हटाव, इंद्रायणी बचाव च्या घोषणा देत आंदोलन करण्यात आले. ‘सत्ताधारी भाजप व महायुती सरकारच्या निष्क्रिय भ्रष्ट कारभारामुळे पवित्र इंद्रायणी नदी आज प्रचंड प्रदूषित झाली असून मरणासन्न अवस्थेत आहे. नमामी इंद्रायणी च्या नावाखाली जनतेची दिशाभूल करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी आजवर पवित्र इंद्रायणीच्या नावाखाली केवळ भ्रष्ट कारभार केला आहे. पण यापुढे हे खपवून घेतले जाणार नाही अशी भावना उपस्थित आंदोलक पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी सत्ताधाऱ्यांचा जाहीर निषेध व्यक्त करत इंद्रायणी नदीला




पुनरुज्जीवीत करण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा येत्या काळात जनआंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल असा इशारा सर्वच महाविकास आघाडीतील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

माजी नगरसेविका सुलभा उबाळे, सुलक्षण शिलवंत धर, गणेश भोंडवे, विनायक रणसुभे, धनंजय आल्हाट, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर चिंचवडे, भोसरी विधानसभा अध्यक्ष ज्ञानेश आल्हाट, यांच्यासह महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैद्यकीय मदतीसाठी पालिकेत गोंधळ!

## शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेस अपात्र असतानाही घातला गोंधळ : माजी नगरसेवकाचा दबावाचा प्रयत्न

**पुणे | प्रतिनिधी**

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ मिळावा, यासाठी एका नागरिकाने आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वाद घातल्याचा प्रकार बुधवारी महापालिकेत घडला. संबंधित व्यक्तीच्या नावावर दोन मिळकती असून ते योजनेच्या अटीमध्ये बसत नाहीत. त्यामुळे लाभ देता येणार नसल्याचे अधिकाऱ्याने सांगताच त्याने गोंधळ घालण्यास सुरुवात केली. तसेच सोबतीला आलेल्या एका माजी नगसेवकानेअधिकाऱ्यांवर दबाव टाकल्याची माहिती समोर आली आहे.



शहरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे, यासाठी महापालिकेकडून विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. त्यापैकीच एक योजना म्हणजे शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना. या योजनेअंतर्गत गरीब व गरजू नागरिकांना महापालिकेच्या दवाखान्यात मोफत उपचार मिळतात. याशिवाय, खासगी दवाखान्यांमध्ये कराव्या लागणाऱ्या आवश्यक उपचाराच्या एकूण खर्चात ५० टक्के सूट मिळते. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना या योजनेचे सभासदत्व घ्यावे लागते. योजनेचे सभासद झाल्यावर महानगरपालिकेद्वारे एक कार्ड दिले दिले जाते. या कार्डावर लाभार्थ्याला महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संलग्न खासगी दवाखान्यांमध्ये स्वस्त दरात उपचार मिळतात. महापालिकेच्या दवाखान्यातून आवश्यक औषधेही मोफत दिली जातात. मात्र, खासगी रुग्णालयात घेण्यात आलेल्या उपचारांसाठी झालेला एकूण खर्च जर एक लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर लाखाच्या पुढील रक्कम लाभार्थ्याला भरावी लागते.

योजनेचे कार्ड काढण्यासाठी संबंधित व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न १ लाख ६० हजार इतके असेल तर त्याला योजनेचा लाभ दिला जातो. कार्ड काढणाऱ्या व्यक्तीची माहिती आरोग्य विभागाच्या संबंधित सॉफ्टवेअरमध्ये टाकण्यात आल्यानंतर तो किती कर भरतो, याची माहिती लगेच समजते. त्यानुसार गोंधळ घालणाऱ्या व्यक्तीच्या नावावर दोन मिळकत आहेत. तो भरत असलेल्या कराचा विचार केला असता, संबंधित व्यक्ती योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अपात्र ठरला होता. हीच गोष्ट महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून त्याला समजावून सांगण्यात येत होती. मात्र तो ही बाब ऐकण्याची परिस्थितीमध्ये नव्हता. काही करुन योजनेचा लाभ द्या, अशी मागणी त्याच्याकडून केली जात होती. त्यावेळी एका माजी नगरसेवकाची त्याला साथ मिळत होती. त्यामुळे अपात्र व्यक्तींना लाभ देण्यासाठी माजी नगरसेवकांकडूनच दबावतंत्र वापले जात असल्याचे दिसून आले.

शहरातील १४ ते १५ हजार नागरिकांनी या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी कागदपत्रांची पूर्तता केली आहे. अनेक नागरिकांना या योजनेचा फायदा होत आहे. मात्र काहीजणांकडून गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### अधिकाऱ्यांवर पैसे घेतल्याचा आरोप

**» यजनेचा लाभ देण्याची मागणी करून गोंधळ घालणाऱ्या व्यक्तीला नियमावली सांगण्यात आली. तसेच ही योजना गोरगरीबांसाठी आहे. तसेच झोपडपट्टीतील नागरिकांसाठी असल्याचे सांगण्यात आल्याने वाद घालणाऱ्याने थेट अधिकाऱ्यांवरच पैसे दिलेच तरच कार्ड देणार असा गंभीर आरोप केला. त्यामुळे अधिकारी अस्वस्थ झाले. कशीबशी समजूत काढण्याचा प्रयत्न केला जात होता. मात्र काही केल्या तो व्यक्ती शांत होत नव्हता. मात्र काही वेळाने प्रकरण शांत झाल्यानंतर ती व्यक्ती आणि माजी नगरसेवक निघून गेले.**

# अखेर बिल्डपुत्राने 300 शब्दांचा निबंध लिहिला!

## 300 शब्दांचा निंबध बालहक्क मंडळकडे सादर : मुलाचे आई- वडिल अजूनही इतर गुन्ह्यांमध्ये तुरुंगात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे पोर्श अपघात प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मद्यधुंद अवस्थेत दोघांना चिरडणाऱ्या अल्पवयीन मुलाने अपघात प्रकरणावर ३०० शब्दांचा निबंध लिहिला आहे. पुण्यातल्या कल्याणी नगर भागात मद्यधुंद अवस्थेत कार चालवून अल्पवयीन मुलाने अश्विनी कोस्टा आणि अनिश अवधिया या दोघांना चिरडलं. ही घटना घडल्यानंतर तातडीने या मुलाला अटक करण्यात आली होती. मात्र न्यायालयात हजर केल्यानंतर या मुलाला न्यायाधीशांनी ३०० शब्दांचा निबंध लिहि आणि पोलिसांसह दोन आठवडे काम कर अशी अट घालत जामीन मंजूर केला. या घटनेनंतर समाजमाध्यमांवर



आणि महाराष्ट्रात चांगलाच संताप पाहण्यास मिळाला. ज्यानंतर या मुलाला बालसुधारगृहात पाठवण्यात आलं. मात्र हा मुलगा बालसुधारगृहातूनही सुटला आहे. तसंच या मुलाने ३०० शब्दांचा निबंध लिहिला आहे.

अपघातानंतर पोलिसांनी आरोपी अल्पवयीन मुलाला बालहक्क मंडळासमोर हजर केलं होतं. त्यावेळी त्याला जामीन मिळाला. याशिवाय रस्ते अपघात आणि त्यावर उपाय या विषयावर ३०० शब्दांचा निबंध लिहिण्याचे त्याला आदेश देण्यात आले.दारूच्या नशेत भरधाव गाडी चालवत दोघांचा जीव घेतल्यानंतर अवघ्या १५ तासांमध्येच त्या अल्पवयीन आरोपीला जामीन मिळाला होता. त्यामुळे नागरिकांतून एक प्रकारची नाराजी आणि संताप व्यक्त झाला. पोलिसांनी त्याच्यावर पुन्हा नवीन कलमं लावली आणि त्याचा जामीन रद्द करावा अशी मागणी केली होती. त्यानंतर आता बाल न्याय मंडळाने त्याचा जामीन रद्द केला तसंच त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली होती. आता या मुलाने ३०० शब्दांचा निबंध लिहिला आहे अशी माहिती समोर आली आहे.

### बालसुधारगृहातून मुलाची सुटका

**» अल्पवयीन बिल्डरपुत्राची काही दिवसांपूर्वी बालसुधारगृहातून सुटका करण्यात आली. सुटका करताना त्यावेळी त्याला काही अटी शर्थी घालून देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये त्याने ३०० शब्दचा निबंध लिहून देण्याची अट होती. या निबंधामध्ये अपघात घडल्यनंतर काय करायले हवे किंवा अपघात घडू नये म्हणून स्वत: काय काळजी घ्यावी या पद्धतीचा निबंध लिहणे आवश्यक होते. बालनिरीक्षणगृहातून बाहेर पडल्यानंतर अखेर अल्पवयीने मुलाने ३०० शब्दांचा निबंध बालहक्क मंडळकडे वकिलांमार्फत सादर केला. मुलाचे आई- वडिल अजूनही इतर गुन्ह्यांमध्ये तुरुंगात आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे अशीही माहिती समोर आली आहे. हिंदुस्थान टाइम्सने हे वृत्त दिलं आहे.**

# शासकीय दस्तऐवजांवर आता आईचे नाव बंधनकारक

## अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांची महापालिकेतील सर्व विभाग प्रमुखांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

शासकीय दस्तऐवजांवर उमेदवाराच्या नावापुढे आईचे नाव लिहिणे बंधनकारक करण्यात यावे, शासन निर्णयाची अंमलबजावणी महापालिका करणार असून त्याबाबतचे निर्देश महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत सर्व विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत.

महिलांना पुरुषांबरोबर समानतेची वागणूक देण्यासाठी, समाजामध्ये महिलांप्रती सन्मानाची भावना निर्माण करण्यासाठी तसेच एकल पालक महिला यांची संतती (अनौरस संतती) यांना देखील समाजामध्ये ताठ मानाने जगता यावे यासाठी शासकीय दस्तऐवजांवर उमेदवाराचे नाव, आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरूपात नाव नोंदविणे बंधनकारक करण्याबाबतच्या धोरणात्मक निर्णय राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने मान्यता दिली आहे. या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देश राज्य शासनाच्या वतीने महापालिकेला प्राप्त झाले आहेत.




विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे, महसुली दस्तऐवज, जन्म व मृत्यू नोंदी दाखला, सेवा पुस्तक विविध परीक्षांचे आवेदनपत्रे इत्यादी शासकीय दस्तऐवजांमध्ये आईचे नाव वेगळ्या स्थंभामध्ये दर्शविण्यात येते. मात्र नव्या निर्णयानुसार आईच्या नावाचा सामावेश वेगळ्या स्थंभामध्ये न दर्शविता उमेदवाराचे नाव, आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरूपात नाव नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे. १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तींना हा निर्णय लागू असणार आहे.

दरम्यान, महापालिकेच्या सर्व विभाग प्रमुखांना आदेश दिले असून नागरिकांशी संबंधित सर्व शासकीय दस्तऐवजांपुढे आईचे बंधनकारक असून त्यांची अंमलबजावणी तत्काळ करण्यात यावी, असेही महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी दिले आहेत.

### विवाहित महिलांनी नाव कसं लिहायचं?

विवाहित महिलांच्या बाबतीत सध्या जी पद्धती आहे म्हणजेच आधी महिलेचं नाव, नंतर तिच्या पतीचं नाव, त्यानंतर आडनाव अशा स्वरुपात नाव लिहिण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे. ज्या महिलांना आपल्या लग्नाआधीचं नाव प्रॉपर्टीच्या कागदपत्रांमध्ये ठेवायचं असेल तर ती मुभाही त्यांना देण्यात आलीय. तसेच अनाथ मुलं किंवा आणखी अपवादात्मक प्रकरणं असतील तर अशा परिस्थिती जन्म/मृत्यू दाखल्यांमध्ये अशा स्वरुपात नाव नोंदवण्यात सूट देण्यात आलीय.

> “ राज्य शासनाच्या नवीन निर्णयानुसार जन्म दाखला, शाळा प्रवेश आवेदनपत्र, सर्व शैक्षणिक कागदपत्रे, जमिनीचा सातबारा, संपत्तीचे सर्व कागदपत्रे, शासकीय अथवा निमशासकीय कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक, सर्व शासकीय अथवा निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनचिठ्ठी, शिधावाटप पत्रिका, मृत्यू दाखला सेवा पुस्तक इत्यादी कागदपत्रांवर आईचे नाव उमेदवाराच्या नावापुढे लिहिणे बंधनकारक करण्यात आले आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी महापालिकेकडून करण्यात येत आहे.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.**

# पिंपरीतील पवार, निगडीतील जाधव टोळीवर ‘मोका’

## नवनाथ ढवळे यांची मागणी : पुनावळे भागातील रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

संघटित गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलिसांनी पिंपरीतील पवार टोळीवर आणि निगडीतील जाधव टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियमांतर्गत (मोका) कारवाई केली. पिंपरी पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये टोळीप्रमुख अविनाश राकेश पवार (वय २८), संतोष उत्तम चौगुले (३०), यश बाबू गरुड (१८), निसार मोहम्मद शेख (२५), रेणुका मारुती पवार (३६), ज्ञानेश्वर ऊर्फ माउली राजेंद्र पाटील (२७, सर्व रा. दत्तनगर, चिंचवड), रंजना उत्तम चौगुले (५२, रा. मोहनगनर, चिंचवड) यांचा समावेश आहे. या टोळीवर ११ गुन्ह्यांची नोंद आहे.




निगडी पोलिसांनी केलेल्या मोकाच्या कारवाईमध्ये टोळीप्रमुख जितेंद्र आनंदा जाधव (वय २३), आकाश ऊर्फ बबूल दत्ता मोरे (१९), अमन समीर शेख, विधिसंघर्षित बालक (सर्व रा. ओटास्कीम, निगडी) यांचा समावेश आहे. या टोळीवर सात गुन्ह्यांची नोंद आहे.

दोन्ही टोळ्यांतील सदस्यांनी स्वतःची संघटित टोळी तयार करून अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याच्या उद्देशाने, तसेच स्वतःच्या गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी हिंसाचाराचा वापर केला. घातक हत्यारे बाळगून दहशत निर्माण केली. खुनी हल्ला, दरोडा, दरोड्याची तयारी, गंभीर दुखापत, दुखापत, कट रचणे, तोडफोड करणे, विनयभंग करणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, अशा प्रकारचे गंभीर गुन्हे या टोळ्यांवर दाखल आहेत. त्यांच्याविरोधात मोकाच्या कारवाईचे आदेश अपर पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांनी दिले.

पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, अपर आयुक्त परदेशी, उपायुक्त संदीप डोईफोडे, स्वप्ना गोरे, सहायक आयुक्त विशाल हिरे, बाळासाहेब कोपनर यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कडलक, निगडीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शत्रुघ्न माळी, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अनिल देवडे, पोलिस अंमलदार सोनटक्के, ओंकार बंड, सचिन चव्हाण, व्यंकप्पा कारभारी यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

### पोलिस आयुक्तांचा 98 जणांना ‘मोका’

» पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत गुन्हेगारीचे उच्चाटन करण्यासाठी पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी कारवाईचा धडाका लावला आहे. यात २०२४ मध्ये १८ संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील ९८ गुन्हेगारांवर ‘मोका’ची कारवाई झाली आहे.

# जगातील पहिली सीएनजी बाईक पुण्यात

## बजाज कंपनीने सीएनजी बाईकची निर्मिती : केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या हस्ते उद्घाटन

**पुणे | प्रतिनिधी**

पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरवाढीमुळे वाहनचालक त्रस्त आहेत. तर, सरकारकडूनही पेट्रोल-डिझेलला पर्याय शोधण्यात येत असून सध्या सीएनजी वाहनांना मोठी मागणी असून चारचाकी सीएनजी वाहनांची बाजारात चलती असल्याचं पाहायला मिळते. त्यातच, आता बजाजकडून जगातील पहिली सीएनजी बाईक लाँच करण्यात आली आहे. केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांच्याहस्ते आज पिंपरी चिंचवडमध्ये या बाईकचा लाँचिंग सोहळा पार पडला. यावेळी, ही सीएनजी बाईक जगातील पहिली सीएनजी दुचाकी असल्याचा दावा बजाजकडून करण्यात आला आहे.




पेट्रोलच्या वाढत्या दराने त्रस्त झालेल्या दुचाकीस्वारांची आता लवकरच मुक्तता होणार आहे. कारण, बजाजने वाढत्या पेट्रोलच्या दराला पर्याय म्हणून सीएनजी बाईकची निर्मिती केली. ज्या बाईकचं अनावरण आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या हस्ते झालं. जगातील ही पहिली सीएनजी बाईक असल्याचा दावा बजाज कंपनीने केला आहे. या बाईकमुळं दुचाकीस्वारांना काही प्रमाणात का होईना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा ऑटोमोबाईल क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे. सीएनजी बाईक ही "बजाजची गॅरंटी" आहे, असं आम्ही म्हणू शकतो. आता तुम्हीही तुमच्या भाषणात 'नितीन गडकरींची गॅरंटी' असा उल्लेख कराल, अशी अपेक्षा आहे, असे म्हणत राजीव बजाज यांनी केंद्रीयमंत्र्यांकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. सीएनजी पंपची देशभरात कमतरता आहे, या सीएनजी पपंची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवावी. या अनुषंगाने राजीव बजाज यांनी ही अपेक्षा व्यक्त केली आहे. तर, नितीन गडकरी यांनीही आपल्या भाषणात बोलताना बाईकच्या किंमतीबाबत अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी बोलताना नितीन गडकरी म्हणाले की, या सीएनजी बाईकची किंमत 1 लाखांपेक्षा कमी असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. प्रदूषणमुक्त भारत करण्याचं माझं सर्वात मोठं ध्येय आहे. त्याअनुषंगाने सीएनजी बाईक या ध्येयाला मोठा हातभार लावेल यात शंका नाही. वाहन उद्योग क्षेत्रात भारताचा आधी जगात सातवा नंबर होता. आता, अलीकडच्या तीन महिन्यांपूर्वीच आपण जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहचलो आहोत. पहिलं यूएसए, दुसरं चायना आणि मग भारताचा नंबर लागतो. आपण वाहन उद्योग क्षेत्रात भरारी घेतोय, असे गडकरी यांनी या बाईक लाँचिंग सोहळ्याप्रकरणी बोलताना म्हटले.

# पुण्यातील जे एम रोडवरील चौपाटी उद्ध्वस्त!

## उच्चस्तरीय समिती स्थापन करून चार आठवड्यात रोड मॅप तयार करण्यास बजावले : याचिकेवरील पुढील सुनावणी 14 ऑगस्ट रोजी

**पुणे | प्रतिनिधी**

पोर्शे कार अपघात, एफसी रोडवरील ड्रग्ज पार्टीनंतर पालिकेच्या बांधकाम विभागाकडून बेकायदा बांधकामावर धडक कारवाई सुरू आहे. शहरात विविध ठिकाणी कारवाई केल्यानंतर जे एम रोड म्हणजे जंगली महाराज रस्त्यावर पेट्रोल पंपाच्या जागेवर जेएम कॉर्नर नावाची चौपाटी उभारली होती. ती चौपाटी गुरुवारी बांधकाम विभागाने कारवाई करत ३४०० चौरस फूट क्षेत्र मोकळे केले.

जंगली महाराज रस्त्यावर पेट्रोल पंपाच्या जागेवर जेएम कॉर्नर नावाची चौपाटी उभारली आहे. या चौपाटीवर २० छोटी मोठी दुकाने आहेत. चौपाटीमध्ये विविध प्रकारच्या शाकाहारी-मांसाहारी खाद्यपदार्थांची विक्री होते. चौपाटीवरील बांधकाम अनधिकृत असल्याने पालिकेने नोटिसा दिल्या होत्या. तसेच कारवाईही करण्यात



आली होती. परंतु बांधकाम हटविण्यात आले नव्हते. येथे पुन्हा व्यवसाय केला जात होता. १५ दिवसांपूर्वीही या चौपाटीवरील व्यावसायिकांना नोटीस बजावली होती. अखेर गुरुवारी पालिकेने कारवाई केली. जेसीबी, दोन गॅस कटर, बिगारींच्या साह्याने ही कारवाई केली.

पुण्यातील ड्रग्ज पार्टीनंतर बेकायदा पब, बार, रेस्टॉरंटवरील थंडावलेल्या कारवाईला पुन्हा जोर मिळाला आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून बेकायदा पब, बार, रेस्टॉरंटचे बांधकाम पाडण्याची धडक कारवाई सुरू आहे. एफ सी रस्त्यासह शहरातील तब्बल २६ ठिकाणांवरील पब, बार, रेस्टॉरंटवर धडक कारवाई केली. त्यानंतर म्हात्रे पूल, राजाराम पूल जवळील नदीपात्रातील डीपी रस्त्यालगतचे अनधिकृत बांधकाम पाडल्यानंतर शुक्रवारी हडपसर भागात कारवाई केली.

शहरात अनेक ठिकाणी बेकायदा बांधकाम करून व्यवसाय केला जातो. त्यावर आता महापालिकेकडून धडक कारवाई केली जात आहे. अनेकांना नोटिसा दिल्यानंतरही बेकायदा बांधकाम काढून घेतले जात नसल्याचे दिसते. महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून फक्त नोटिसांचा खेळ खेळला जात होता. मात्र कारवाई केली जात नव्हती. आता महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी बांधकाम विभागाने दिलेल्या नोटिसांचा पाठपुरावा सुरू केला असून नोटिसा दिल्यानंतर काय कारवाई केली जाते, याचा आढावा घेत आहे. त्यामुळे आता बांधकाम विभागाला जाग आली आहे.